

# वर्सोवा-विरार सागरी सेतूला अर्थसाहाय्य

## जपानच्या अर्थमंत्र्यांची देवेंद्र फड ावीसांना ग्वाही

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** वर्सोवा-विरार सागरी सेतूला जपान अर्थसहाय्य करणार असल्याची ग्वाही अर्थ, व्यापार आणि उद्योग मंत्री यासुतोशी निशिमुरा यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गुरुवारी दिली. हरित ऊर्जानिर्मिती किंवा नैसर्गिक वायूवर आधारित परिवहन प्रकल्प महाराष्ट्रात उभारण्याचे आवाहन फडणवीस यांनी जपानमधील बड्या जेरा वीज कंपनीस केले.

फडणवीस यांनी निशिमुरा यांची भेट घेतली. तेव्हा मुंबई पारबंदर प्रकल्प, मेट्रो तीन प्रकल्प, बुलेट ट्रेन प्रकल्प आदी प्रकल्पांपुढील अडथळे दूर केल्याबद्दल निशिमुरा यांनी आनंद व्यक्त केला आणि वर्सोवा-विरार सागरी सेतूला अर्थसहाय्य करण्याचे आश्वासन दिले. फडणवीस यांनी मित्सुबिशीचे उपाध्यक्ष हिसाहिरो निशिमोटो यांची भेट घेतली. मित्सुबिशीने तळेगाव येथे गुंतवणूक केली असून पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पासून सुरु होणार आहे.

सेमीकंडक्टर क्षेत्रात मोठी गुंतवणूक आकर्षित करण्याची राज्य सरकारची इच्छा असून महाराष्ट्रात आणखी विस्तार करण्यास मित्सुबिशीने अनुकूलता दर्शविली आहे. फडणवीस यांनी एनटीटी डेटाचे उपाध्यक्ष हिदेएकी ओझाकी यांची भेट घेतली. एनटीटीचे पुण्यात डेटा सेंटर आहे. फडणवीस यांनी जायकाचे वरिष्ठ उपाध्यक्ष नाकाझावा केईचिरो यांच्याबरोबर झालेल्या भेटीत मेट्रो-३, मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, बुलेट ट्रेन आदी प्रकल्पांना वित्तपुरवठा केल्याबद्दल आभार मानले.